


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८७ • गुरुवार दि.१३ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंघ बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला



## मातासाहेब गुरुद्वारा परिसरातील घटना;आरोपी जेरबंद

**नांदेड/प्रतिनिधी-पंजाब राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंघ बादल यांच्यावर आज (गुरुवार) दुपारी मातासाहेब गुरुद्वारा परिसरात एका जणाने हल्ला केला. या हल्ल्यात सुखबीरसिंघ बादल व त्यांच्या सुरक्षेत तैनात असलेले पोलीस निरिक्षक संतोष केंद्रे हे दोघेजण जखमी झाले आहेत. जखमींना यशोसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले. बादल यांची प्रकृती स्थिर असून रुग्णालय परिसरात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला. या घटनेमुळे नांदेडसह संपुर्ण देशात खळबळ उडाली आहे.**

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंघ बादल हे कुटुंबियांसमवेत तीन दिवसांच्या नांदेड दौऱ्यासाठी बुधवारी सायंकाळी श्री गुरु गोविंदसिंघजी नांदेड विमानतळावर आगमन झाले. त्यांचा मुक्काम स्टेडियम परिसरातील एका हॉटेलमध्ये होता. बादल कुटुंबियांच्या वतीने सचखंड गुरुद्वारा येथे धार्मिक विधी आयोजित करण्यात आला होता. बुधवारी सायंकाळी सुखबीरसिंघ बादल व त्यांच्या पत्नी खा.हरसिमरत कौर बादल व कुटुंबियांनी सचखंड गुरुद्वारा येथे कुटुंबियांसमवेत जावून गुरुद्वाराचे दर्शन घेतले.

सुखबीरसिंघ बादल हे आज (गुरुवार) दुपारी मातासाहेब गुरुद्वारा येथे दर्शनासाठी गेले होते. गुरुद्वाराचे दर्शन घेवून बाहेर जात असतांना एका सेवादाराने त्यांच्यावर एका छोट्या शस्त्राने हल्ला केला. बादल यांनी उजवा हात पुढे केल्याने सदरील शस्त्राचा वार त्यांच्या हातावर बसला. या हल्ल्यात त्यांच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. बादल यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले विशेष सुरक्षा पथकातील पोलीस निरीक्षक संतोष केंद्रे यांनी पान ४ वर

### मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतला घटनेचा आढावा

बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला झाल्याची घटना वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. नांदेडसह संपुर्ण देशात खळबळ उडाली असून अकाली दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे सतत नांदेडमधील त्यांच्या हितचिंतकाशी संपर्क साधून बादल यांच्या प्रकृतीची चौकशी करीत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्याशी फोनवर संपर्क साधून घटनेचा आढावा घेतला. बादल यांच्यावरील हल्ल्याच्या घटनेची पोलीसांकडून चौकशी सुरु करण्यात आली आहे. हल्ल्यामागचे कारण अजूनही स्पष्ट झालेले नाही.

# संसदेचे अधिवेशन गुंडाळले;लाठीहल्ल्याचे प्रश्न अनुत्तरितच

## पंतप्रधान नरेंद्र मोदी-अमित शहा यांची लोकसभेत हजेरी

नवी दिल्ली: तीन आठवडे संसद ठप्प ठेवून अखेरच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत दाखल झाले; पण चर्चा सुरू होण्याआधीच वंदे मातरम गितानंतर लगचेच संसदेचे अधिवेशन अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आल्याची घोषणा सभापती ओम बिर्ला यांनी केली. मोदी-शहा सभागृहात येत नाहीत या विरोधकांच्या आरोपाला उत्तर देण्यासाठी दोन्ही नेत्यांची उपस्थिती झाली की काय, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, ज्या गंभीर प्रश्नांवरून संपूर्ण अधिवेशन गाजले, त्यापैकी एकाही प्रश्नावर ठोस चर्चा न होताच पडदा पडला.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनास २० जुलैपासून सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीपासूनच नीट-यूजी पेपरफुटी, जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलनावर झालेली कारवाई, राम मंदिर देणगी प्रकरण यांसह अनेक मुद्द्यांवरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा यांनी सभागृहात येऊन उत्तर द्यावे, अशी मागणी सातत्याने होत राहिली. मात्र सत्ताधारी आणि विरोधकांच्या आरोप-प्रत्यारोपात लोकसभेचे कामकाज वारंवार ठप्प झाले. विरोधकांचा गोंधळ हेच कामकाज ठप्प होण्याचे कारण असल्याचा आरोप सत्ताधारी पक्षाने केला; तर सरकार महत्त्वाच्या प्रश्नांपासून पळ काढत असल्याचा पलटवार विरोधकांनी केला. परिणामी तीन आठवड्यांच्या अधिवेशनात लोकसभेचा मोठा वेळ घोषणाबाजी, तहकुबी आणि आरोप-प्रत्यारोपांतच गेला. संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने हा प्रकार गंभीर असल्याची टीका होत आहे. दरम्यान, गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांशी चर्चेची तयारी दर्शविल्याचे भाजपकडून सांगण्यात आले. नीट-यूजी पेपरफुटी आणि त्यानंतर झालेल्या विद्यार्थी आंदोलनाबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सरकार तयार असल्याचा दावा सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी केला. विरोधकांनी चर्चेऐवजी गोंधळाचा मार्ग स्वीकारल्यामुळे सभागृहाचे कामकाज ठप्प झाल्याचा आरोपही भाजपकडून करण्यात आला. दुसरीकडे, विरोधकांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विद्यार्थी आंदोलनावर झालेली कारवाई, नीट पेपरफुटीचा प्रश्न, संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची पान ४ वर

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण



नांदेड/प्रतिनिधी-भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन समारंभ शनिवार १५ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणार आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ९.०५ वा. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांच्या ध्वजारोहणाचे कार्यक्रम सकाळी ८.३५ वाजेपूर्वी किंवा ९.३५ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बँग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृह विभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, असेही जिल्हा प्रशासनाच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.




नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाचा पदभार आ.डॉ.तुषार राठोड व उपाध्यक्षपदाचा पदभार डॉ.मिनल पाटील खतगावकर यांनी आज (गुरुवार) स्वीकारला आहे. यावेळी बँकेचे प्रशासक तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आ.अमरनाथ राजूरकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा यांच्यासह बँकेचे संचालक उपस्थित होते.

# आयोगाच्या निर्णयाचा घटनापीठात पुनर्विचार करा

## कपिल सिब्बल यांची मागणी; शिवसेना प्रकरणी १८ रोजी सुनावणी

नवी दिल्ली:निवडणूक आयोगाच्या अधिकारांबाबत पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने यापूर्वी दिलेल्या निर्णयाचा पुनर्विचार सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे सोपवावा, अशी ठाम मागणी ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात केली. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे.

शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला ठाकरे गटाने दिलेल्या आव्हानावर सुरू असलेल्या सुनावणीत सिब्बल यांनी आयोगाच्या अधिकारांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यामुळे सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर आता शिंदे गटाची बाजू तसेच सर्वोच्च न्यायालय या प्रकरणातील कोणते मुद्दे घटनापीठाकडे सोपवते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.शिवसेनेतील फुटीनंतर निवडणूक आयोगाने शिंदे गटाकडे अधिक आमदार असल्याच्या आधारावर पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. सुनावणी दरम्यान सिब्बल यांनी आयोगाने आपल्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा ओलांडल्याचा युक्तिवाद केला. आमदारांच्या अपात्रतेची कार्यवाही प्रलंबित असताना शिंदे गटाच्या आमदारांची संख्या पक्षाचे नाव आणि चिन्ह निश्चित करण्यासाठी निर्णायक मानणे योग्य आहे का, असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला. संबंधित आमदार अपात्र ठरले असते तर संख्याबळाचे समीकरण बदलले असते, त्यामुळे अपात्रतेचा निर्णय होण्यापूर्वीच संख्याबळाच्या आधारे निर्णय घेणे योग्य नसल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निर्दर्शनास आणून दिले.२०१८ ची शिवसेनेची पक्षघटना निवडणूक आयोगाने पूर्वी मान्य केली होती. त्याच पक्षघटनेनुसार शिंदे पक्षातील पदांवर राहिले, आमदार झाले आणि मंत्रीही झाले. मात्र, बंडानंतर हीच पक्षघटना अमान्य असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे मान्य असलेली पक्षघटना नंतर अमान्य ठरविण्याचा आधार काय, असा प्रश्न सिब्बल यांनी उपस्थित केला.

## ग्रा.पं.च्या आश्वासनानंतर मांडवीतील महिलांचे उपोषण स्थगित

# मटन मार्केट स्थलांतराचा प्रश्न मार्गी लागणार



मांडवी/प्रतिनिधी-शहरातील मध्य वस्तीत असलेले मटन, चिकन व मच्छी मार्केट त्वरित स्थलांतरित करण्यात यावे, या मागणीसाठी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी महिला मंडळाच्या वतीने करण्यात येणारे लाक्षणिक उपोषण तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.ग्रामपंचायतीने दिलेल्या ठोस आश्वासनानंतर महिलांनी हा निर्णय घेतला.

मांडवी येथील सेवालाल मंदिर, सरस विद्यालयाची नर्सरी शाळा आणि मुलींच्या वसतिगृहाजवळच हे मटन-मच्छी मार्केट आहे. या मुळे भाविक, लहान मुले आणि विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत होता. हे मार्केट इतरत्र हलवून तिथे व्यावसायिकांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी महिला मंडळाने केली होती.महिलांचे उपोषण टाळण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी तातडीने पावले उचलली. गावात जागा उपलब्ध नसल्याने गायरान जमीन मार्केटसाठी उपलब्ध करून देण्याचा ठराव घेण्यात आला. त्यानुसार १३ ऑगस्ट रोजी किनवटच्या तहसीलदारांकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. निवासी जिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता, प्रस्ताव प्राप्त होताच तो तात्काळ मंजुरीसाठी मार्गी लावू, असे आश्वासन त्यांनी दिले.सेवालाल मंदिरात ग्राम अधिकारी सुरेश पडलवार आणि पदाधिकाऱ्यांनी उपोषण-कर्त्या महिलांशी सकारात्मक चर्चा करून त्यांची समजूत काढली. प्रशासनाकडून पान ४ वर

# शाहांना उपपंतप्रधान व्हायचे;मोदींचा विरोध

## संजय राऊतांचा खळबळजनक दावा

नवी दिल्ली:केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना तत्काळ उपपंतप्रधान व्हायचे आहे; मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा त्यास विरोध असल्याचा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला. मोदी-शाह यांच्यात मतभेद असल्याचेही ते म्हणाले.

आज सकाळी माध्यमांच्या प्रतिनिधींनी अमित शाह संसदेत निवेदन करणार असल्याच्या प्रश्नावर राऊत यांनी शाह घाबरलेले असल्याचा दावा केला. देशातील नकारात्मक घटनांची जबाबदारी अमित शाह यांच्यावर असल्याचे मोदींनाही पटले आहे, असे ते म्हणाले.आगामी मंत्रिमंडळ फेरबदलात शाह मंत्रिमंडळात राहतील की नाही, याबाबतही राऊत यांनी शंका व्यक्त केली. खेळ संपला आहे, असे ते म्हणाले.मोदी-शाह यांच्यात वाद आहे का, या प्रश्नावर राऊत यांनी, अमित शाहांना तत्काळ देशाचे उपपंतप्रधान व्हायचे आहे; मात्र नरेंद्र मोदींनी त्याला स्पष्ट नकार दिला आहे. मी जे सांगतोय ते शंभर टक्के सत्य आहे, असेही म्हटले. मोदींनंतर देशाचे नेतृत्व कोण करणार, या प्रश्नावर राऊत यांनी अमित शाह यांचे नाव फेटाळले. मोदी पर्यंत किती राहतील, याबाबतही शंका असल्याचे सांगत आगामी आंदोलन ईव्हीएमविरोधात होईल, असा दावा त्यांनी केला. भाजपमधील अंतर्गत वादाबाबत राऊत यांनी पक्षावरही टीका केली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेससह अनेक पक्ष फोडून निर्माण झालेली ती एक वसाहत आहे. ती कधीही उद्ध्वस्त होईल, असा टोला त्यांनी लगावला.

## कोण कोणापासून पळ काढतय?

संसदेचे पावसाळी अधिवेशन म्हणजे देशातील जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे व्यासपीठ. पण यंदाच्या अधिवेशनात एक वेगळेच चित्र दिसत आहे. प्रश्न विद्यार्थी विचारत आहेत, विरोधक प्रश्न विचारत आहेत, देश उत्तर मागत आहे; मात्र सत्ताधारी मंडळी प्रश्नांपासून पळत आहेत की; विरोधक संसदेतून पळत आहेत, हा खरा सवाल आता देशासमोर उभा राहिला आहे. पेपरफुटीच्या प्रश्नावर विद्यार्थ्यांनी दिल्लीच्या रस्त्यावर उतरण्यापूर्वीच वातावरण तापले होते. जंतर-मंतरवर सोनम वांगचुक उपोषणाला बसले होते. विद्यार्थ्यांची मागणी साधी होती; परीक्षा व्यवस्था पारदर्शक करा, पेपरफुटीला आळा घाला आणि नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाला, जंतर-मंतरवरील कारवाई झाली आणि संसद मार्चदरम्यान पोलिसांकडून अश्रुधूर, लाठीचार्ज आणि पॅलेट गनच्या वापराबाबत गंभीर आरोप झाले. मुद्दा इथेच संपत नाही. विद्यार्थ्यांवर अशी कारवाई करण्याचे आदेश कोणी दिले? पॅलेट गनचा वापर कोणी मंजूर केला? साध्या हातात पुस्तक असलेल्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करण्याची गरज का भासली? राहुल गांधी यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून याच प्रश्नांची उत्तरे मागितली. बिहारमधील विद्यार्थ्यांवर कथितपणे एके-४७ मधून गोळीबार झाल्याच्या आरोपांनी तर या प्रकरणाला आणखी गंभीर वळण दिले. सत्ताधारी पक्षाने हा आरोप फेटाळला आणि तो खोटा असल्याचे म्हटले. त्यामुळे नेमके सत्य काय, हे स्पष्ट करण्याची जबाबदारी सरकारचीच आहे. आरोप खोटे असतील तर पुराव्यांसह ते खोडून काढा; आणि खरे असतील तर जबाबदार कोण, हे सांगा. लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्याला देशद्रोही ठरवून प्रश्न संपत नाही. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा राजकीय दबाव वाढत गेला आणि अखेर २५ जुलैला धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा दिला. म्हणजे विद्यार्थ्यांचा प्रश्न काल्पनिक नव्हता, त्यामागे वास्तव होते. संसदेत पेपरफुटीविरोधात कायदा आणला गेला, हे स्वागतार्ह आहे. पण कायदा करून प्रश्न संपत नाही. विद्यार्थ्यांना न्याय हवा आहे, परीक्षा यंत्रणेवर विश्वास हवा आहे आणि दोषींवर कारवाई हवी आहे. पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदा आवश्यक आहे; त्याहून आवश्यक आहे तो कायदा प्रामाणिकपणे राबविण्याची राजकीय इच्छाशक्ती. आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणतात, ''मी सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे.'' विरोधक म्हणतात, आम्हाला भाषण नको, उत्तर हवे. हा वाद केवळ अमित शहा आणि राहुल गांधी यांच्यातला नाही. हा वाद सत्तेच्या अहंकाराचा आणि जनतेच्या प्रश्नांचा आहे. सत्ताधारी म्हणतात राहुल गांधी संसदेतून पळ काढत आहेत. पण राहुल गांधींचा सवाल स्पष्ट आहे. विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करण्याचे आदेश कोणी दिले? मग त्याचे उत्तर सभागृहात द्यायला काय हरकत आहे? सरकारकडे उत्तर असेल तर चर्चा व्हावी. आरोप खोटे असतील तर ते सभागृहाच्या पटलावर सिद्ध करावेत. संसद ही घोषणांची नव्हे, उत्तरदायित्वाची जागा आहे. आणि जर विरोधक संसद चालू देत नसतील, तर सत्ताधाऱ्यांनीही एक प्रश्न स्वतःला विचारायला हवा. विरोधकांना चर्चेची संधी देऊन प्रश्न संपवायचे की, प्रश्नच विचारू नयेत म्हणून संसद संपवायची? आजची जेन झी पिढी जुन्या राजकीय भाषेला घाबरत नाही. ती प्रश्न विचारते, पुरावे मागते आणि उत्तर मिळेपर्यंत सोशल मीडिया असो वा रस्ता; आपला आवाज बुलंद ठेवते. त्यामुळे आता प्रश्न 'कोण कोणापासून पळ काढत आहे?' हा नाही; खरा प्रश्न असा आहे, सत्तेच्या खुर्चीवर बसलेले लोक जनतेच्या प्रश्नांना सामोरे जाण्यापासून किती दिवस पळणार? लोकशाहीत सत्ता येते-जाते; पण प्रश्न विचारणारी पिढी कायम राहते. आज विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे, उद्या तो प्रत्येक नागरिकाचा प्रश्न असेल. म्हणून संसदेतून पळ काढण्यापेक्षा प्रश्नांना सामोरे जा. कारण जेन झीला भाषण नकोय, उत्तर हवे आहे!

# संविधानाने दिलेला अधिकार आणि मोठ्या पदाची गरिमा



भारतीय लोकशाही ही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित व्यवस्था नाही. लोकशाही म्हणजे जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी जनतेशी सातत्याने संवाद साधणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, प्रश्नांना वाचा फोडणे आणि सत्ताधारी असो अथवा विरोधी पक्षात असो, लोकहितासाठी आपली भूमिका मांडणे होय. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळे सरकारच्या धोरणांवर टीका करणे, प्रश्न विचारणे, सूचना करणे, चांगल्या कामाचे कौतुक करणे आणि आपले प्रश्न लोकप्रतिनिधींपुढे मांडणे हा नागरिकांचा अधिकार आहे.

लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष वेगवेगळ्या भूमिका घेतात. कधी ते कट्टर विरोधक असतात, तर एखाद्या विषयावर त्यांची भूमिका समानही असू शकते. राजकारणात संवाद आणि सहकार्यही असते. राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात; कायमस्वरूपी असायला हवे ते जनतेचे हित आणि संविधानावरील निष्ठा. लोकांमधून निवडून आलेला खासदार, आमदार, नगराध्यक्ष, नगरसेवक किंवा अन्य लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर केवळ आपल्या पक्षाचा प्रतिनिधी राहत नाही. तो संपूर्ण मतदारसंघाचा प्रतिनिधी होतो. त्याला मतदान केलेल्या नागरिकांप्रमाणेच मतदान न केलेल्या नागरिकांचे प्रश्नही त्याच्यासाठी महत्त्वाचे असले पाहिजेत. निवडणूक संपल्यानंतर मतदारसंघ हा पक्षाचा राहत नाही; तो लोकप्रतिनिधीच्या जबाबदारीचा भाग बनतो. एखादा आमदार सत्ताधारी पक्षाचा असो वा विरोधी पक्षाचा, त्याच्याकडे येणारा नागरिक आधी नागरिक असतो आणि नंतर त्याची राजकीय ओळख. पाणी, रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण, रोजगार किंवा प्रशासनातील अडचणी घेऊन कोणताही नागरिक आपल्या लोकप्रतिनिधीकडे जाऊ शकतो. त्याचे म्हणणे ऐकून घेणे ही लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे.

विधान परिषद सदस्य असो, आमदार असो, खासदार असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी असो, त्यांच्याशी नागरिकांनी संवाद साधणे ही लोकशाही प्रक्रियेची महत्त्वाची बाजू आहे. त्यांना भेटणे हा कोणाचाही उपकार नाही आणि भेटणाऱ्या व्यक्तीवर संशय घेण्याचेही कारण नाही. नागरिक एखाद्या लोकप्रतिनिधीला भेटून सरकारच्या धोरणांवर मत व्यक्त करू शकतो. एखाद्या निर्णयामुळे अडचण निर्माण झाली असेल तर निवेदन देऊ शकतो. धोरण चांगले वाटले तर त्याचे कौतुक करू शकतो आणि चुकीचे वाटले तर तीव्र नाराजीही व्यक्त करू शकतो. हे सर्व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या चौकटीत येते. मग अशा परिस्थितीत पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री किंवा वरिष्ठ लोकप्रतिनिधींना त्यांच्या राजकीय विचारांपेक्षा वेगळ्या विचारसरणीचे लोक भेटले, तर त्याचे राजकीय भांडवल करण्याचे कारण काय? विरोधी विचारसरणीचा एखादा प्रतिनिधी सत्तेतील व्यक्तीला भेटला म्हणजे त्याने आपली विचारसरणी सोडली, असे होत नाही. भेटणे म्हणजे समर्थन करणे नव्हे आणि संवाद साधणे म्हणजे राजकीय शरणागती नव्हे.

लोकशाहीमध्ये संवादाची दारे बंद झाली तर लोकशाहीचा आत्माच कमकुवत होतो. विचारभिन्नता असली तरी संवाद आवश्यक आहे. सरकारची भूमिका समजून घेण्यासाठी, आपली भूमिका मांडण्यासाठी किंवा जनतेचा प्रश्न मांडण्यासाठी सत्ताधाऱ्यांची भेट घेणे स्वाभाविक आहे. म्हणूनच विरोधी विचारसरणीच्या, विशेषतः डाव्या विचारांच्या प्रतिनिधींनी पंतप्रधानांची भेट घेतली असेल, तर त्याचे राजकीय भांडवल करणे योग्य नाही. विरोधी विचारांच्या व्यक्तींनी सत्ताधाऱ्यांना भेटू नये, असा कोणताही घटनात्मक नियम नाही.आपण आपल्या राजकीय आयुष्यात अनेकदा पाहिले आहे की कालपर्यंत एकमेकांवर कठोर टीका करणारे नेते नंतर एकत्र येतात. कालचे मित्र आज विरोधक असतात आणि कालचे विरोधक आज सहकारी होतात. 'कधी अंधार, कधी उजेड' हे राजकारणात चालतच असते. मात्र या सर्व प्रक्रियेत एक गोष्ट महत्त्वाची आहेमोठ्या पदाची गरिमा. एखाद्या व्यक्तीला मोठे घटनात्मक किंवा लोकप्रतिनिधीचे पद मिळते, तेव्हा त्यासोबत अधिकारच नव्हे तर मोठी जबाबदारीही येते. खासदार, आमदार, मंत्री, मुख्यमंत्री किंवा अन्य मोठ्या पदावरील व्यक्तीच्या एका विधानाचा परिणाम हजारो-लाखो लोकांवर होऊ शकतो. त्यामुळे अशा व्यक्तींनी संयम राखणे आवश्यक असते.

कोण भेटले, का भेटले, काय चर्चा झाली यावरून तात्काळ निष्कर्ष काढणे आणि त्यातून वाद निर्माण करणे हे मोठ्या पदाच्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही. प्रत्येक गोष्टीचे राजकीय भांडवल करण्याची प्रवृत्ती वाढली तर लोकशाहीतील विश्वास कमी होतो.आज समाजमाध्यमांच्या काळात एखादा फोटो, भेट किंवा विधान काही क्षणांत जनतेपर्यंत पोहोचते. त्यामुळे जबाबदार राजकीय व्यक्तींनी अधिक सावधपणे वागणे गरजेचे आहे. विनाकारण वाद निर्माण करून स्वतःची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न उलटाही ठरू शकतो. जनता राजकारण समजून घेते. कोण कोणाच्या विरोधात होते, कोण कोणासोबत होते आणि कोणत्या वेळी कोणती भूमिका घेतली, हे जनतेच्या लक्षात असते.एक सामान्य नागरिक म्हणून सरकारच्या चुका दाखवणे आणि चांगल्या कामाचे कौतुक करणे, हीच लोकशाहीची भूमिका आहे. सरकार म्हणजे शत्रू आणि विरोधक म्हणजे मित्र, असा साधा हिशेब लोकशाहीमध्ये चालत नाही. योग्य निर्णयाला समर्थन आणि चुकीच्या निर्णयाला विरोध, हेच विवेकाचे लक्षण आहे. राजकारण म्हणजे सतत संघर्ष नव्हे. राजकारण म्हणजे संवाद, मतभेद, चर्चा, तडजोड, संघर्ष, सहकार्य आणि जनहितासाठी निर्णय घेण्याची प्रक्रिया आहे. सत्ताधारी असल्यामुळे सरकारच्या प्रत्येक निर्णयाचे समर्थन करणे योग्य नाही आणि विरोधक असल्यामुळे प्रत्येक निर्णयाला विरोध करणेही योग्य नाही. विवेकाने योग्य-अयोग्य ठरवणे आवश्यक आहे. म्हणूनच ज्येष्ठ व्यक्ती म्हणून एक सल्ला द्यावासा वाटतो, संयमाने वागा. हा सल्ला टीका म्हणून नव्हे, तर आपुलकीतून आहे. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तीने टीका ऐकण्याची क्षमता ठेवली पाहिजे. फक्त कौतुक करणारे नव्हे, तर चुका दाखवणारे आणि आरसा दाखवणारे लोकही जवळ असणे गरजेचे आहे.आपल्या राजकीय जीवनात अनेकदा असे घडते की आजूबाजूच्या लोकांकडून 'अमुक व्यक्ती तुमच्या विरोधात आहे', 'तमुक व्यक्ती कट करत आहे', अशा गोष्टी सांगितल्या जातात. मात्र प्रत्येक गोष्ट खरी मानण्यापूर्वी तिची सत्यता तपासली पाहिजे. कान हलके असतील तर चांगल्या माणसाचेही नुकसान होते आणि स्वतःचेही. मतभेद असणे ही कमजोरी नाही; मतभेद सहन न होणे ही कमजोरी आहे. विरोधकांशी बोलणे ही कमजोरी नाही; विरोधकांशी बोलण्याची भीती ही कमजोरी आहे. टीका ऐकणे ही कमजोरी नाही; टीका करणाऱ्याला शत्रू समजणे ही कमजोरी आहे. आणि आपल्यापेक्षा वेगळ्या विचारांच्या व्यक्तीला भेटणे म्हणजे आपल्या विचारांचा पराभव नाही.लोकशाहीचे सौंदर्यच हे आहे की आपण एकमेकांशी सहमत नसतानाही एकत्र राहू शकतो. संसदेत विरोधक सरकारवर टीका करतात, सरकार आपली बाजू मांडते. विधानसभेत आरोप-प्रत्यारोप होतात. मात्र अधिवेशन संपल्यानंतर लोकप्रतिनिधी एकमेकांशी संवाद साधतात. हीच लोकशाहीची संस्कृती आहे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

मोठ्या पदावर असलेल्या प्रत्येक व्यक्तीने घटनात्मक मूल्यांची जपणूक केली पाहिजे. पद मोठे असेल तर संयम मोठा असला पाहिजे. अधिकार मोठे असतील तर जबाबदारीही मोठी असली पाहिजे. राजकीय ताकद मोठी असेल तर मनही मोठे असले पाहिजे.जनतेला भांडणारे नेते नको आहेत; जनतेचे प्रश्न सोडवणारे नेते हवे आहेत. सतत आरोप करणारे नव्हे, तर जनतेचे म्हणणे ऐकून घेणारे नेते हवे आहेत. प्रत्येक भेटीत राजकारण शोधणारे नव्हे, तर प्रत्येक भेटीत लोकहित शोधणारे नेते हवे आहेत.मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तीला भेटण्यासाठी आलेला माणूस कोणत्या विचाराचा आहे, कोणत्या पक्षाचा आहे किंवा त्याने मतदान केले होते की नाही, यापेक्षा तो कोणता प्रश्न घेऊन आला आहे हे महत्त्वाचे आहे. प्रश्न योग्य असेल तर त्यासाठी प्रयत्न करा; चुकीचा असेल तर समजावून सांगा. पण त्याला शत्रू समजू नका. सत्ता जनतेने दिलेली असते. पद संविधानाने आणि जनतेच्या विश्वासाने मिळालेले असते. त्यामुळे त्या पदाची प्रतिष्ठा राखणे ही संबंधित व्यक्तीची नैतिक जबाबदारी आहे.म्हणून विनाकारण वाद निर्माण करू नका. प्रत्येक भेटीचे राजकीय अर्थ लावू नका. प्रत्येक विरोधाला वैयक्तिक शत्रुत्व समजू नका. प्रत्येक टीकेला अपमान समजू नका. आणि प्रत्येक राजकीय घडामोडीत स्वतःची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करू नका.

आपण इतिहासाकडे पाहिले तर इंदिरा गांधींच्या राजकीय जीवनातूनही एक महत्त्वाची गोष्ट शिकता येतेसंकटाच्या काळात मनोधैर्य गमावू नये. मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तीचे सामर्थ्य त्याच्या प्रतिक्रियेत नसते; ते त्याच्या संयमात असते. आजूबाजूच्या लोकांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवण्याऐवजी स्वतः विचार करा. स्वतःच्या निर्णयांचे आणि कृतींचे आत्मपरीक्षण करा. मनातील ईर्ष्या, द्वेष, गैरसमज आणि संशय यांना राजकीय निर्णयांवर हावी होऊ देऊ नका.राजकारणात चढ-उतार येत राहतील. आज सत्ता असेल, उद्या नसेल. आज मित्र असतील, उद्या विरोधक होतील आणि आजचे विरोधक उद्या सहकारी होऊ शकतात. समीकरणे बदलत राहतील. पण माणूस म्हणून आपली प्रतिष्ठा, सार्वजनिक जीवनातील विश्वासार्हता आणि लोकांच्या मनातील स्थान टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे.म्हणून पुन्हा एकदा सांगावेसे वाटतेसंयमाने वागा. मोठ्या पदाची गरिमा सांभाळा. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा आणि विरोधकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर करा. संवादाची दारे बंद करू नका. राजकारणात 'कधी अंधेरा, कधी उजाला' हे चालत राहणारच. परिस्थिती बदलणार, भूमिका बदलणार, समीकरणे बदलणार. मात्र आपण आपल्या मूल्यांपासून, विवेकापासून आणि लोकशाहीच्या संस्कृतीपासून दूर जाऊ नये.

शेवटी सत्ता टिकते की नाही, हे काळ ठरवतो; पण व्यक्तिमत्त्वाची प्रतिष्ठा टिकवायची की नाही, हे आपल्या हातात असते. विनाकारण बोलून स्वतःची प्रतिमा मलिन करू नका. टीका आली तर संयमाने ऐका, चूक झाली तर स्वीकारा, चांगले काम झाले तर त्याचे श्रेय द्या, विरोधक भेटले तर संवाद साधा आणि जनता प्रश्न घेऊन आली तर तिचे म्हणणे ऐका.हा सल्ला कोणत्याही राजकीय हेतूने नाही; आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळ्यापोटी आहे. सार्वजनिक जीवनात मोठे होणे ही एक गोष्ट आहे; मात्र मोठे झाल्यानंतर मोठेपण टिकवणे ही त्याहून मोठी गोष्ट आहे. पद मोठे असेल तर वर्तनही मोठे असावे; अधिकार मोठे असतील तर संयमही मोठा असावा; आणि राजकारण मोठे असेल तर मनही मोठे असावे. हीच खरी लोकशाहीची गरिमा आणि हीच आपल्या संविधानाची अपेक्षा आहे.

# बाजार समितीची जमीन बेकायदा ताब्यात?

## कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाचे निवेदन

माहूर/प्रतिनिधी-कृषी उत्पन्न बाजार समिती माहूरच्या मालकीची सर्वे नं. १ (अ) मधील १ हेक्टर २१ आर जमीन सह्याद्री जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था, माहूरला शेतकऱ्यांच्या हितासाठी जिनिंग उभारण्याच्या उद्देशाने १२ सप्टेंबर १९९४ रोजी वार्षिक दोन हजार रुपये नाममात्र भाड्याने २८ वर्षांच्या लीजवर देण्यात आली होती. या लीजची मुदत ११ सप्टेंबर २०२२ रोजीच संपली; मात्र त्यानंतर तब्बल चार वर्षांचा कालावधी उलटत आला तरी जमीन बाजार समितीच्या ताब्यात आलेली नाही. त्यामुळे बाजार समितीच्या मालकीच्या जमिनीचा ताबा नेमका कोणाकडे आणि लीज संपल्यानंतरही जमीन परत का मिळाली नाही, असा सवाल उपस्थित झाला आहे.११ ऑगस्ट रोजी सभापती व संचालक मंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी, नांदेड तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्यवस्थापकांसह संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

लीजची मुदत संपल्यानंतर बाजार समितीने संबंधित संस्थेकडे जमीन ताब्यात देण्याबाबत वारंवार लेखी व तोंडी पाठपुरावा केला. २९ एप्रिल २०२६ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव क्र.७ (१) मंजूर करून जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच सह्याद्री जिनिंगच्या अवसायकांकडे जमीन बाजार समितीच्या ताब्यात देण्याची मागणी करण्यात आली. मात्र, त्यानंतरही प्रत्यक्ष ताबा मिळालेला नसल्याने बाजार समितीने आता आक्रमक भूमिका घेतली आहे.या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे बाजार समितीच्या म्हणण्यानुसार, सह्याद्री जिनिंगने बाजार समितीकडून लीजवर घेतलेल्या जमिनीच्या आधारे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सुमारे ११.९० लाख रुपयांचे कर्ज उचलले होते. हे कर्ज व्याजासह आज ९० लाख रुपयांपेक्षा अधिक झाल्याचे बाजार समितीच्या पत्रव्यवहारात नमूद आहे. संबंधित जमिनीवर बँकेचा बोजाही चढविण्यात आला आहे. बाजार समितीच्या मालकीची जमीन असताना तिच्यावर एवढ्या मोठ्या कर्जाचा बोजा कसा निर्माण झाला, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.सह्याद्री जिनिंगची मालमत्ता आणि कर्ज रेणुका कृषक सहकारी संस्थेकडे वर्ग करण्याचा व्यवहार झाल्याचे संबंधित पत्रव्यवहारातून समोर आले. मात्र, या मर्जींग प्रक्रियेला जिल्हा उपनिबंधक, नांदेड यांनी मान्यता न देता ती रद्द केली. त्याविरोधात विभागीय सहनिबंधकांकडे अपील करण्यात आले. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात गेले. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १५३९९/२०१७ वर १३ जुलै २०२६ रोजी उच्च न्यायालयाने निर्णय देत याचिका फेटाळल्याचे बाजार समितीच्या कागदपत्रांत नमूद करण्यात आले आहे.

यापूर्वी अवसायकांनी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने लीजची जमीन ताब्यात देण्याबाबत निर्णय घेता येणार नाही, अशी भूमिका घेतली होती. मात्र, उच्च न्यायालयाचा निकाल समोर आल्यानंतर बाजार समितीने पुन्हा जमीन ताब्यात घेण्यासाठी प्रशासनाकडे धाव घेतली आहे. त्यामुळे आता न्यायालयीन



प्रकरणाचा आधार घेत जमीन ताब्यात देण्यास टाळाटाळ करण्याचा प्रश्नच उरत नाही, असा बाजार समितीचा दावा आहे. दरम्यान, ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत लीजवर दिलेली जमीन बाजार समितीच्या ताब्यात घेण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी सभापती व संचालक मंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी, नांदेड तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्यवस्थापकांसह संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. लीजची मुदत संपलेली असताना जमीन अद्याप बाजार समितीच्या ताब्यात का देण्यात आली नाही, जमिनीवर बँकेचा बोजा कसा निर्माण झाला आणि कर्जप्रकरणात नेमकी कायदेशीर प्रक्रिया झाली, याची चौकशी करून जमीन तातडीने बाजार समितीच्या ताब्यात देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी जिनिंग उभारण्यासाठी दिलेली जमीन आज बाजार समितीच्या विकासकामांसाठीच अडथळा ठरत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. बाजार समितीच्या मालकीच्या जमिनीवर बोजा असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताची विकासकामे करण्यास अडचणी येत असल्याचे बाजार समितीने निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे लीज संपूनही जमीन परत का मिळाली नाही, बाजार समितीच्या मालकीच्या जमिनीवर कर्जाचा बोजा कसा चढला आणि या संपूर्ण प्रकरणात जबाबदार कोण, याचा खुलासा प्रशासनाने करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालय आता कोणती भूमिका घेते, जमिनीची चौकशी करून बाजार समितीला प्रत्यक्ष ताबा मिळवून देते का आणि बँकेचा बोजा हटविण्यासाठी काय कार्यवाही होते, याकडे माहूर तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारावरील जीर्ण भगवा ध्वज बदलण्याची मागणी



हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहराच्या प्रमुख प्रवेशद्वारावर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार परिसरातील जीर्ण झालेला भगवा ध्वज तातडीने बदलून त्या ठिकाणी नवीन व सुस्थितीतील भगवा ध्वज बसवावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त ॲड.दिगांबर सुर्यवंशी यांनी दि.११ ऑगस्ट रोजी न.प.च्या मुख्याधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे. तसेच प्रवेशद्वार परिसरातील बंद असलेल्या स्ट्रीट लाईट तातडीने दुरुस्ती करून त्या पुन्हा सुरू कराव्यात, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हदगाव शहराच्या मुख्य रोड प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार हे शहराची ओळख आणि आकर्षणाचे प्रमुख केंद्र मानले जाते. या कमानीवरील भगवा ध्वज सध्या जीर्ण व खराब अवस्थेत असून, त्यामुळे प्रवेशद्वाराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि शौर्याचे प्रतीक असलेल्या या प्रवेशद्वाराची योग्य देखभाल होणे आवश्यक आहे. त्यामुळे लावण्यात आलेला जीर्ण भगवा ध्वज तात्काळ उतरवून त्याठिकाणी नवीन, सुस्थितीतील भगवा ध्वज बसवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, प्रवेशद्वार परिसरातील अनेक स्ट्रीट लाईट बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी परिसरात अंधाराचे वातावरण निर्माण होत आहे. या अंधारामुळे नागरिकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होण्या बरोबरच सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे बंद असलेल्या स्ट्रीट लाईटची तातडीने दुरुस्ती करून त्या पुन्हा सुरू कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.शहराच्या सौंदर्याबरोबरच सुरक्षिततेचा प्रश्न प्रवेशद्वार हे हदगाव शहरात येणाऱ्या नागरिकांचे प्रथम स्वागत करणारे ठिकाण आहे. त्यामुळे या परिसराची स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि सुशोभीकरणाकडे नगरपरिषदेने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. जीर्ण ध्वजामुळे शहराच्या सौंदर्यावर परिणाम होत असताना बंद स्ट्रीट लाईटमुळे रात्रीच्या वेळी परिसर असुरक्षित बनत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.या दोन्ही समस्यांकडे नगरपरिषद प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. विशेषतः दोनही बाबींची तातडीने दखल घेऊन नवीन भगवा ध्वज बसवावा आणि बंद स्ट्रीट लाईट सुरू कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# शक्तिपीठ जोगवा यात्रा १५ रोजी नांदेडात येणार

नांदेड/प्रतिनिधी-विश्वशांती, विश्वकल्याण, धर्मकार्य आणि सांस्कृती संवर्धनाचा संदेश देणारी श्रीक्षेत्र तुळजापूर ते श्रीक्षेत्र गाणगापूर शक्तिपीठ जोगवा यात्रा १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान नांदेड शहरात येत आहे. तरी शहरातील सर्व दत्तभक्त व देवीभक्तांनी या दुर्मीळ आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी केले आहे. गुरुतत्व प्रदीप आयोजित श्री दत्त दुर्गा महानुष्ठान निमित्त परमपूज्य मकरंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा काढण्यात येणार आहे. यात्रेत आई तुळजाभवानीची मूर्ती, जोगव्याची परडी तसेच भगवान श्रीदत्तप्रभूंच्या पावन पादुका भाविकांच्या दर्शनासाठी उपलब्ध राहणार आहेत. प्रत्येक ठिकाणी भवानी पूजन, परडी पूजन, नामस्मरण, गोंधळ पदे आणि जोगवा संकलनाचे कार्यक्रम होणार आहेत. १५ ऑगस्ट रोजी हडको येथील दत्तकृपा मंगल कार्यालयात यात्रेचे आगमन होणार आहे. १६ रोजी अंबिका मंगल कार्यालयात श्री दत्तयागाचे आयोजन केले आहे. यानंतर विवेकानंद नगर परिसरात यात्रेचे दर्शन होईल. १७ रोजी मुक्तेश्वर आश्रम (वसंतनगर), हनुमान मंदिर (विद्युतनगर), हनुमान मंदिर (अशोकनगर) आणि श्री गजानन महाराज मंदिर (मालेगाव रोड) येथे भाविकांना दर्शन व जोगवा अर्पणाची संधी मिळणार आहे.

# 'द जर्नलिस्ट असोसिएशन'च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी मा.ना.झेंपलवाड यादव



नांदेड/प्रतिनिधी-द जर्नलिस्ट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी प्रख्यात स्तंभलेखक, संपादक व राजकीय विश्लेषक मा.ना. झेंपलवाड यादव यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष राकेशजी डी. यादव यांनी मुंबई येथे त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

दैनिक विष्णुपुरी एक्सप्रेसचे संपादक म्हणून दीर्घकाळ कार्यरत असलेले यादव यांनी निर्भीड, निष्पक्ष व अभ्यासपूर्ण पत्रकारितेतून सर्वसामान्यांचे प्रश्न सातत्याने मांडले आहेत. ग्रामीण व दुर्गम भागातील पत्रकारांच्या प्रश्नांसह पत्रकारांच्या कायदेशीर हक्कांसाठी संघटनात्मक पातळीवर काम करण्याचा त्यांचा अनुभव आहे. नियुक्तीनंतर बोलताना यादव यांनी राष्ट्रीय नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत महाराष्ट्रातील पत्रकारांचे संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. पत्रकारांवरील हल्ले व दडपशाहीविरोधात कायदेशीर लढा उभारणे, पत्रकारांचे आरोग्य, विमा, गृहनिर्माण व निवृत्तीवेतनाच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणे, तसेच डिजिटल माध्यमातील पत्रकारांना संघटित करणे यांना प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.या नियुक्तीबद्दल राज्यभरातील पत्रकार, संपादक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी ना. झेंपलवाड यादव यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# पूरग्रस्त महिलांना तुळजाई महिला मंडळाचा मदतीचा हात;जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



मांडवी/प्रतिनिधी- पिंपळगाव परिसरात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. या संकटग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी तुळजाई महिला मंडळ, मांडवीच्या वतीने पुढाकार घेत पूरग्रस्त महिलांना त्यांच्या गरजेनुसार जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

अतिवृष्टी व पुरामुळे घरातील साहित्याचे नुकसान झाल्याने दैनंदिन गरजा भागविताना महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन तुळजाई महिला मंडळाने तत्परतेने मदतीचा हात पुढे केला. पूरग्रस्त महिलांच्या मागणीनुसार आवश्यक जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या.या मदतकार्यावेळी तुळजाई महिला मंडळाच्या अध्यक्षा जयश्रीताई राठोड, उपाध्यक्षा लता राऊलवार, कोषाध्यक्षा रत्नप्रभा नेताम यांच्यासह शीला शेंडे, अर्चना शेंडे, वनिता मुनेश्वर, गंगा तुमरान, कोमल मरस्कोल्हे आणि शंकर गुरनुले उपस्थित होते. संकटाच्या काळात तुळजाई महिला मंडळाने केलेल्या या मदतीमुळे पूरग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत महिलांच्या मदतीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल मंडळाच्या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# आता खेळ बदलणार! कोण होणार करोडपतीच्या नव्या पर्वाचे सूत्रसंचालन माधुरी दीक्षित करणार




नांदेड/प्रतिनिधी-मराठी मनोरंजनविश्वातील लोकप्रिय ज्ञानाधारित कार्यक्रम कोण होणार करोडपती नव्या पर्वासह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सोनी मराठी वाहिनी आणि Sony LIV यांच्या माध्यमातून प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाच्या नव्या पर्वाचे सूत्रसंचालन महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित माधुरी दीक्षित करणार आहेत. त्यांच्या आगमनामुळे कार्यक्रमाच्या नव्या पर्वाची ऐतिहासिक सुरुवात होणार असून, आता खेळ बदलणार! अशी घोषणा करण्यात आली आहे.

माधुरी दीक्षित यांनी गेल्या अनेक दशकांपासून आपल्या अभिनय आणि नृत्यकौशल्याने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. आता त्या आपल्या खास शैलीत कोण होणार करोडपतीचे सूत्रसंचालन करताना दिसणार आहेत. त्यामुळे कार्यक्रमात नवी ऊर्जा, नवा दृष्टिकोन आणि उत्साह पाहायला मिळणार आहे. कोण होणार करोडपती हा केवळ प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम नसून, सामान्य माणसाच्या ज्ञानाला आणि जिद्दीला व्यासपीठ देणारा मंच म्हणून त्याने प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. ज्ञानाच्या बळावर स्वप्नांना नवी दिशा देण्याची संधी या कार्यक्रमातून मिळते. नव्या पर्वाबद्दल माधुरी दीक्षित यांनी हा कार्यक्रम महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या आशा, स्वप्ने आणि ज्ञानावरील विश्वासाचा उत्सव असल्याचे सांगितले. स्पर्धकांच्या जिद्दीचा, संघर्षाचा आणि स्वप्नांचा प्रवास जवळून अनुभवता येणार असल्याने आपण या नव्या प्रवासासाठी उत्सुक असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

# भांड्याच्या गोदामावर डल्ला; आंतरराज्यीय टोळी काही तासांत जेरबंद

कुंडलवाडी/प्रतिनिधी-शहरातील चुंगी नाका रोडवरील भांड्याच्या गोदामाचे कुलूप तोडून सुमारे ४७ हजार रुपये किमतीची पितळी व तांब्याची भांडी चोरून नेणाऱ्या अंतरराज्यीय टोळीला कुंडलवाडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले. आरोपींकडून चोरीस गेलेला मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे.

कुंडलवाडी येथील व्यापारी अनिल मारोती शिंदे, रा. हरनाळी यांचे चुंगी नाका रोडवर भांड्याचे गोदाम आहे. १२ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी गोदामाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर गोदामातील पितळी व तांब्याची भांडी असा सुमारे ४७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी शिंदे यांनी कुंडलवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रार मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासांत संशयितांना ताब्यात घेतले. सायलु नागय्या बिंगी, पोशट्टी गंगाराम उर्फ पोशट्टी इडबिडी, येन कव्वा कृष्णा आम्मा आणि गंगामणी सायलु बिंगी, सर्व रा. बोधन व रुद्रूर, यांची चौकशी केली असता चोरीचा मुद्देमाल त्यांच्याकडे आढळून आला. पोलिसांनी आरोपींकडून पितळी पाण्याची टाकी, टोमॅटोच्या आकाराचे भांडे, पाण्याचे हंडे, प्लेट्स, गंगा-जमुना घागर, टोपले तसेच अन्य पितळी व तांब्याच्या वस्तू असा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पदवी प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम मुदत २० ऑगस्टपर्यंत वाढविली

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आला आहे. विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या विनंतीनुसार प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम मुदत ३१ जुलै ऐवजी आता २० ऑगस्ट करण्यात आली आहे.

विद्यापीठाने यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शैक्षणिक वेळापत्रक निश्चित केले होते. त्यानुसार प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम तारीख १८ जून ते २४ जून अशी होती. तसेच मार्च २०२६ मध्ये बारावीची पुरवणी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष प्रवेशासाठी ३१ जुलै पर्यंत संधी देण्यात आली होती.मात्र, विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी प्रथम वर्ष प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रवेशाची अंतिम तारीख आता २० ऑगस्ट अशी निश्चित करण्यात आली आहे.याबाबत विद्यापीठाच्या शैक्षणिक नियोजन व विकास विभागाने दि.११ ऑगस्ट रोजी शुद्धीपत्रक जारी केले असून, सर्व संबंधितांनी सुधारित मुदतीची नोंद घ्यावी, असे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे.मुदतवाढीमुळे अद्याप पदवी प्रथम वर्षासाठी प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, संबंधित विद्यार्थ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शैक्षणिक नियोजन व विकास विभागाचे उपकुलसचिव यांनी केले आहे.

# पीपल्स कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा;युवा भूषण स्पर्धेत सय्यद सत्तार प्रथम




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेज, नांदेडचे विद्यार्थी सय्यद सत्तार यांनी युवा भूषण-जय जगत २०२६ या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या लौकिकात मानाची भर घातली आहे.मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या हस्ते त्यांना प्रथम पारितोषिक व २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले.

सय्यद सत्तार यांच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक जाणीव आणि समाजसेवेची दिशा देण्यात पीपल्स कॉलेजच्या समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख तसेच प्राध्यापकवृंदांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. समाजशास्त्राच्या अध्ययनातून समाजातील विविध घटकांकडे संवेदनशीलतेने पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विकसित झाला. त्यातूनच वंचित घटकांना मदत करणे, गरजू विद्यार्थ्यांना निःशुल्क मार्गदर्शन करणे तसेच विविध सामाजिक प्रश्नांविषयी जनजागृती करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेत सय्यद सत्तार यांनी युवा भूषण-जय जगत २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. त्यांच्या या यशामुळे पीपल्स कॉलेजच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याच्या लौकिकात आणखी भर पडली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल सय्यद सत्तार यांचे तसेच त्यांना सातत्याने मार्गदर्शन करणाऱ्या समाजशास्त्र विभागातील प्राध्यापकांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. भविष्यातही सय्यद सत्तार यांच्या सामाजिक कार्याचा आणि यशाचा आलेख उंचावत राहावा, तसेच त्यांच्या हातून समाजसेवेचे कार्य सातत्याने घडावे, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# भर पावसाळ्यातील उकाड्याने नागरिक हैराण

नांदेड/प्रतिनिधी-गेल्या पाच-सहा दिवसांपासून वातावरणात अचानक बदल झाला आहे. याचा परिणाम म्हणजे भर पावसाळ्यात नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. आठ दिवसांपूर्वी बऱ्यापैकी झालेल्या पावसाने शेतकऱ्यांसह सामान्य नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला होता. परंतु दररोज ढगांनी गच्च भरुन येणारे आभाळ सायंकाळच्यावेळी मात्र अचानक गायब होत आहे. यामुळे यंदा मात्र नागरिकांना भरपावसाळ्यात उकाड्याचा सामना करावा लागत आहे. जेमतेम पडणाऱ्या पावसाने काही प्रमाणात पिके तरली असली तरी अजूनही मोठ्या पावसाची प्रतिक्षा शेतकऱ्यांसह नागरिकांना आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **QUAZI MAJEEUDDIN SHABBIRULABEDIN** which now I am, changing as (new name) **MAJEEUDDIN QUAZI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**MAJEEUDDIN QUAZI**

R/o H.no.25/300,Labour colony
near Water tank Nanded-431602
M.No.- 9021442101

CHANGE IN NAME

My (old name) is **PRATIBHA SURESH SAWANT** which now I am, changing as (new name) **PRABHA SURESH SAWANT**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**PRABHA SURESH SAWANT**

R/o A-18, Mantri nagar Bhavsar chowk
Taroda khurd Nanded-431605
M.No.- 9158874295

# प्रलंबित मार्जिनची रक्कम द्या

## अन्यथा रास्त भाव दुकानदार करणार उपोषण

अर्धापूर/प्रतिनिधी-राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत रास्तभाव दुकानदारांना मिळणारी प्रलंबित मार्जिनची रक्कम तातडीने अदा करावी, या मागणीसाठी अर्धापूर तालुका रास्तभाव दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटनेने तहसीलदारांना निवेदन दिले. प्रलंबित मार्जिनची रक्कम न मिळाल्यास १५ ऑगस्ट पासून उपोषण करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

संघटनेने १२ ऑगस्ट रोजी अर्धापूर तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत फेब्रुवारी २०२६ ते जुलै २०२६ या सहा महिन्यांची रास्त भाव दुकानदारांची मार्जिन रक्कम अद्याप मिळाली नाही. त्यामुळे दुकानदार आर्थिक अडचणीत आहेत. कार्यालयीन विलंबामुळे मागील सहा महिन्यांपासून मार्जिन रकमेची प्रतीक्षा करावी लागत असून, याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. केंद्र सरकारकडून रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिन रकमेचा निधी उपलब्ध करुन दिलेला असून, महाराष्ट्र शासनानेही संबंधित प्रक्रियेनुसार समतुल्य मार्जिनचा निधी वितरित करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे दुकानदारांची प्रलंबित मार्जिन रक्कम तातडीने वितरित करावी, अशी मागणी संघटनेने केली. निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष उद्धवराव पाटील राजेगावकर, उपाध्यक्ष गौतम लोणे, कार्याध्यक्ष आनंद सूर्यवंशी, सचिव कैलास पोळेकर, बालाजी कदम, महादू मरकुंदे, राजाकोळी, अवधूत पवार, कोंडिबा देशमुख, मुगाजी जाधव, बाजीराव साबळे, आमेर भाई, शुभम देशमुख, शिवानंद दासे, अशोक कांबळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# देगलूर तालुक्यातील अनेक गावांत पाणी टंचाईची समस्या

## ३६ गावातील बोरवेलचे झाले काय? ;देगलूर पंचायत समितीचा अजब कारभार

(संग्रहित छायाचित्र)



देगलूर/प्रतिनिधी- देगलूर तालुक्यातील ग्रामीण भागात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना अनेक गावांमध्ये पाणी टंचाईची समस्या गंभीर बनली आहे. टंचाईग्रस्त गावांसाठी ३६ गावामध्ये बोरवेल घेण्याचा प्रस्ताव असतानाही प्रत्यक्षात अंमलबजावणी नाही, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

पाणी टंचाईच्या प्रश्नावर वारंवार सबंधित अधिकाऱ्याकडे विचारणा करूनही प्रक्रिया सुरू आहे, लवकरच कारवाई होईल अशा स्वरूपाची उडवा उडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप नागरिकाकडून होत आहे. त्यामुळे ३६ गावांसाठी प्रस्तावित बोरवेल नेमक्या कुठे झाल्या?, किती कामे पूर्ण झाली?, किती प्रलंबित आहेत? यासाठी किती निधी मंजूर झाला आणि किती खर्च झाला? याची स्पष्ट माहिती प्रशासनाने जनतेसमोर मांडावी अशी अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र काही ठिकाणी योजना कागदावरच राहतात का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जल जीवन मिशन, टंचाई निवारण उपाययोजना, बोरवेल, विहीर दुरुस्ती आणि पाणीपुरवठा योजनांची प्रत्यक्ष स्थिती काय आहे. याची तपासणी होणे गरजेचे आहे. इकडे पाणी टंचाईची तीव्रता वाढत असताना दुसरीकडे प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसतील तर याला जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. पाणी हा नागरिकांचा मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे या विषयाकडे केवळ प्रशासकीय कागदपत्रे प्रक्रिया म्हणून पाहण्याऐवजी प्रत्यक्ष गावामध्ये जाऊन परिस्थितीची पाहणी करणे आवश्यक आहे. ३६ गावातील बोरवेलचा प्रस्ताव, मंजुरी, निधी, कामांची सद्यस्थिती आणि प्रत्यक्ष लाभार्थी गावांची यादी प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे. गावकऱ्यांना टँकरची वाट पाहण्याची वेळ येऊ नये, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. जनतेच्या पैशातून राबविल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या योजनांचा हिशोब आणि प्रत्यक्ष परिणाम जनतेसमोर येणे आवश्यक आहे. ३६ गावांच्या बोरवेलचे काय झाले?, निधी कुठे गेला?, कामे कुठे झाली? या प्रश्नांची उत्तरे देगलूर पंचायत समिती प्रशासनाने जनतेला देणे गरजेचे झाले आहे.

# मोहफुलाच्या दारुचा अड्डा उद्ध्वस्त; आरोपी पोलिसांच्या ताब्यात

किनवट/प्रतिनिधी-शनिवारपेठ येथील माधव धोंडीबा माहुरे या इसमाचा मदनापूर शिवारात रेल्वे धावपट्टीच्या पुर्व बाजूस जंगलातील नालाच्या काठावरील गावठी हातभट्टी दारुअड्डा किनवट पोलीसांनी धाड घालून १२ ऑगस्ट रोजी उद्धस्त केला. मुद्देमालासह आरोपीला ताब्यात घेऊन गुन्ह्याची नोंद केली आहे. या प्रकरणी पोहेकाँ. मेंडके करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

मोहफुल सोडविण्यासाठी आणि त्यातून दारु गाळपाचे काम चालू होते. १०० लिटर क्षमतेच्या प्लास्टिकच्या तीन टाक्यांमध्ये मोहफूलं भिजवत ठेवलेले होते. ३१ हजार रुपये किंमतीचे रसायन ताब्यात बाळगून भट्टी पेटवुन गावठी दारु तयार करीत असतांना किनवट पोलीसांनी धाड घालून अड्डा उध्वस्त केला. शिवाय दारु अड्डा चालक माधव माहूरे यालाही ताब्यात घेतले होते. पोलीस उपनिरीक्षक नितेश लेनगुळे यांच्या फिर्यादीवरून गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पो.नि.गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ.मेंडके यांच्याकडे पुढील तपास सोपविण्यात आला आहे. शनिवारपेठ व परिसरात हाच एकमेव दारू अड्डा असेल असे नाही, अनेक अड्डे असल्याचे लोकांकडून ऐकायला मिळते. एकदा छापा टाकल्यानंतर अड्डे बंद होतात असे नाही. पुन्हा जोमाने अड्डे सक्रीय होतात. कायमस्वरूपी अड्डे बंद केल्यास वेसनाधीन झालेल्या तरुणाईची सुटका होऊन उरलेसुरले संसार उद्धस्त होण्यापासून वाचतील अशा अनेकांच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.

# माणिकराव इंगोले यांच्या निधनाने वरिष्ठ सहकारी गमावला!

## खा.अशोक चव्हाण यांची प्रतिक्रिया

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष माणिकराव इंगोले यांच्या निधनाने राजकारण व समाजकारणातील एक वरिष्ठ सहकारी गमावल्याची भावना माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

इंगोले यांच्या निधनावर तीव्र दुःख व्यक्त करताना ते म्हणाले की, माणिकराव इंगोले हे मातीशी नाळ जुळलेले नेते होते. त्यांनी त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथून केली. पंचायत समितीचे सदस्य व सभापती, जिल्हा परिषद सदस्य व अध्यक्ष अशा अनेक पदांवर त्यांनी यशस्वीपणे काम केले. सर्वसामान्यांचे विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते नेहमी आग्रही राहिले. त्यांच्याशी माझा कौटुंबिक स्नेह होता. अलिकडेच त्यांच्या घरी जाऊन मी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती.

# माहूर आगाराला पाच नव्या राजमाता जिजाऊ बसगाड्यांची भेट;आ.केराम यांच्या हस्ते लोकार्पण

माहूर/प्रतिनिधी-साडे तीन शक्तिपीठांपैकी एक मूळ शक्तिपीठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माहूरगडच्या एसटी प्रवासी सेवेला आता अधिक बळकटी मिळणार आहे. आ.भीमराव केराम यांच्या प्रयत्नातून माहूर आगाराला पाच नवीन राजमाता जिजाऊ बसगाड्या उपलब्ध झाल्या असून, या बसगाड्यांचा लोकार्पण सोहळा बुधवारी आ. भीमराव केराम यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

यावेळी आ.केराम यांच्या हस्ते फीत कापून बससेवेचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर श्रीफळ अर्पण करून नवीन बसगाड्यांचे विधिवत पूजन करण्यात आले. लोकार्पणानंतर आमदार केराम यांनी बसगाड्यांची पाहणी केली तसेच स्वतः बसमधून प्रवास करून सुविधांची माहिती घेतली.माहूर हे धार्मिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र असल्याने वर्षभर राज्याच्या विविध भागांतून भाविक व पर्यटक येथे दाखल होत असतात. याशिवाय तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी नांदेडसह इतर शहरांमध्ये ये-जा करण्यासाठी एसटी बससेवा ही प्रमुख सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. मात्र उपलब्ध बसगाड्यांची संख्या आणि वाढती प्रवासी संख्या यामध्ये तफावत निर्माण झाल्याने अनेक मार्गांवर प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत होता.ही बाब लक्षात घेऊन माहूर आगारासाठी नवीन बसगाड्या उपलब्ध करून देण्याची मागणी आ.भीमराव केराम यांनी परिवहन विभागाकडे केली होती. नव्या बसगाड्या अत्यंत आरामदायी असून प्रवाशांना सुरक्षित, सुखकर आणि अधिक दर्जेदार प्रवासाचा अनुभव मिळेल. ग्रामीण भागातील नागरिकांसोबतच माहूरगडावर येणाऱ्या भाविकांनाही या बससेवेचा मोठा फायदा होणार असल्याचे आ.केराम यांनी सांगितले. प्रवाशांना दर्जेदार, वेळेवर आणि विश्वासार्ह सेवा देण्यावर भर द्यावा, तसेच उपलब्ध बसगाड्यांचे योग्य नियोजन करून प्रवाशांच्या गरजेनुसार मार्गांवर वापर करावा, अशा सूचना त्यांनी केल्या. माहूर आगारात पाच नव्या बसगाड्या दाखल झाल्यामुळे ग्रामीण प्रवाशांना दिलासा मिळणार असून, वाढत्या प्रवासी संख्येच्या तुलनेत



एसटीची सेवा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. विशेषतः आगामी धार्मिक यात्रा व पर्यटनाच्या काळात या बसगाड्यांचा भाविकांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी निळकंठ मस्के, गोपु महामुने, अनिल वाघमारे, प्रा. राजेंद्र केशवे, नंदकुमार जोशी, विजय आमले यांच्यासह एसटी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडात उद्यापासून सप्तरंग सांस्कृतिक महोत्सव

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय कला, संस्कृती आणि लोकपरंपरांचा जागर करणाऱ्या सप्तरंग सांस्कृतिक महोत्सव २०२६ ला दि.१४ ऑगस्टपासून नांदेड येथील कुसुम सभागृह, आय.टी.आय. रोड येथे प्रारंभ होत आहे. दि.१४ ते १६ ऑगस्टदरम्यान आयोजित या महोत्सवात देशातील विविध राज्यांमधून ५०० हून अधिक कलाकार सहभागी होत असून, तीन दिवस विविध कला प्रकारांचे सादरीकरण होणार आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी रंगमंच क्रमांक १ वर विविध शास्त्रीय, उपशास्त्रीय, समूह नृत्य तसेच लावणी नृत्याचे सादरीकरण होणार आहे. तर रंगमंच क्रमांक २ वर गायन, वाद्यसंगीत तसेच मॉडर्न डान्सचे विविध कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. देशातील ८ राज्यांमधून कलाकार नांदेडमध्ये दाखल झाले असून, त्यांच्या विविध कलाविष्कारांची मेजवानी नांदेडकरांना अनुभवता येणार आहे. याचबरोबर आज महोत्सवस्थळी मोफत फिजिओथेरपी तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत नागरिकांसाठी फिजिओथेरपी तपासणी मोफत करण्यात येणार आहे. अंगदुखी, सांधेदुखी, स्नायूंच्या समस्या किंवा इतर शारीरिक त्रास असलेल्या नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.महोत्सवाचे भव्य उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून, कला, संस्कृती आणि सामाजिक उपक्रमांचा सुंदर संगम या निमित्ताने नांदेडकरांना अनुभवता येणार आहे. नांदेडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध राज्यांमधून आलेल्या कलाकारांच्या कलाविष्कारांचा आनंद घ्यावा तसेच मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सान्वी जेठवाणी, अध्यक्ष, सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या लढ्याला यश;उमरखेडचे मृद व जलसंधारण कार्यालय जैसे थे!

## आ.वानखेडे,नितीन भुतडा यांच्या प्रयत्नांना यश;उमरखेड-महागावच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा

उमरखेड/प्रतिनिधी-मृद व जलसंधारण विभागाचे उमरखेड येथील उपविभागीय कार्यालय पुसद येथे हलविण्याच्या हालचाली सुरू असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर उमरखेड-महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र, या निर्णया विरोधातील शेतकऱ्यांच्या लढ्याला अखेर यश आले असून उमरखेड येथील उपविभागीय कार्यालय जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उमरखेड हा भौगोलिक दृष्ट्या विस्तीर्ण व दुर्गम तालुका असल्याने मृद व जलसंधारणाच्या विविध योजनांसाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय आवश्यक असल्याची भूमिका आ.किसनराव वानखेडे यांनी घेतली. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे थेट पाठपुरावा करून उमरखेडचे कार्यालय पुसद येथे स्थलांतरित करू नये, अशी मागणी केली. दरम्यान, भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत मंत्रालयात मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांची भेट घेऊन उमरखेडचे कार्यालय कायम ठेवण्याची मागणी केली. उमरखेड व महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मृद व जलसंधारण विभागाच्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी कार्यालय जवळ असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानंतर विभागीय सचिवांनी तातडीने कार्यवाही करत उमरखेड येथील उपविभागीय कार्यालय पूर्वीप्रमाणेच ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे उमरखेड-महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून या निर्णयाचे शेतकरी वर्गातून स्वागत होत आहे. मृद व जलसंधारण विभागांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालयांची रचना देखील स्पष्ट करण्यात आली आहे. भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी याबाबतही पाठपुरावा केला होता. त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यालयांची कार्यक्षेत्रे राहणार आहेत. यवतमाळ-यवतमाळ, बाभूळगाव, दिग्रस-दिग्रस, पुसद, उमरखेड-उमरखेड, महागाव, मारेगाव-मारेगाव, वणी, घाटंजी-घाटंजी, आर्णी, नेर-नेर, दारव्हा, राळेगाव-राळेगाव, कळंब, केळापूर-केळापूर, झरी. या निर्णयामुळे यवतमाळ जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागाची प्रशासकीय रचना कायम राहणार असून संबंधित तालुक्यांतील शेतकऱ्यांना विभागीय योजनांसाठी अधिक सुलभ सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# उमरी न.प.ला कायमस्वरुपी मुख्याधिकारी;सोनाली बनस्वाल यांनी स्वीकारला पदभार

उमरी/प्रतिनिधी-उमरी नगर परिषदेला अखेर कायमस्वरूपी मुख्याधिकारी मिळाले असून, सोनाली बनस्वाल यांनी मंगळवारी नगर परिषद कार्यालयात मुख्याधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. गेल्या अनेक वर्षांपासून नगर परिषदेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी उपलब्ध नसल्याने विविध अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त प्रभार सोपविण्यात येत होता. त्यामुळे प्रशासकीय कामकाजावरही त्याचा परिणाम होत होता.



मंगळवारी सोनाली बनस्वाल यांनी उमरी नगर परिषदेच्या मुख्याधिकारीपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांच्या पदभार स्वीकारण्यावेळी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रवीणभाऊ सारडा यांच्यासह नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कायमस्वरूपी मुख्याधिकारी नियुक्त झाल्यामुळे नगर परिषदेच्या प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील नागरी सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, विकासकामे तसेच नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे आता अधिक प्रभावीपणे लक्ष दिले जाईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

नांदेड/प्रतिनिधी-पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंघ बादल यांच्यावरील हल्ल्याच्या घटनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. सुखबीरसिंघ बादल यांच्यावर आज दुपारी माता साहिब गुरुद्वारा परिसरात हल्ला करण्यात आला. या घटनेचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला असून पोलीस अधीक्षकांना तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत.

पान १ वरुन

## पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री...

हल्लेखोराला पकडण्याचा प्रयत्न केला. हल्लेखोराने संतोष केंद्रे यांच्या हातावरही वार केला. यामध्ये केंद्रे यांच्या हाताला जखम झाली. सुरक्षा रक्षकांनी व पोलीसांनी तात्काळ हल्लेखोरास ताब्यात घेतले. सुखबीरसिंघ बादल यांच्या हाताला जखम झाल्याने त्यांना तातडीने नांदेड येथील यशोसाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेची माहिती समजताच विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी रुग्णालयात दाखल झाले. बादल यांची प्रकृती स्थिर असून रुग्णालय परिसरात पोलीसांच्या बंदोबस्तात प्रचंड वाढ करण्यात आली. पोलीस निरिक्षक संतोष केंद्रे यांनाही उपचारासाठी यशोसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## संसदेचे अधिवेशन...

मागणी तसेच अयोध्येतील राम मंदिर देणगी प्रकरण यावर सरकारने सभागृहात स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी विरोधकांनी केली. अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मोदी आणि शहा दोघेही लोकसभेत उपस्थित राहिले. मात्र, या उपस्थितीचा गाजावाजा होण्याआधीच आज लोकसभेचे कामकाज सुरु होताच सभापती ओम बिर्ला यांनी वंदेमातरम् सुरु केले. ते संपताच संसदेत अधिवेशनाचे कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा केली. त्यामुळे आज सभागृहात कुठलेच कामकाज होवू शकले नाही. तीन आठवड्यांच्या अधिवेशनाचा असा शेवट म्हणजे जनतेच्या प्रश्नांचा सभागृहात झालेला अवमानच असल्याची टीका होत आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही आपापल्या राजकीय भूमिकांवर ठाम राहत चर्चेचा मार्ग बंद केला. प्रश्न गंभीर होते; पण त्यांची उत्तरे मात्र सभागृहाच्या भिंतीबाहेरच राहिली. नीट-यूजी पेपरफुटी, जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांवरील कारवाई, संबंधित मंत्र्यांच्या राजीन्याची मागणी आणि अयोध्येतील राम मंदिर देणगी प्रकरणावर नेमके काय उत्तर मिळाले? सरकारने काय कारवाई केली? विरोधकांचे प्रश्न का अनुत्तरित राहिले? या प्रश्नांची उत्तरे अधिवेशन संपले तरी मिळालेली नाहीत.

## ग्रा.पं.च्या आश्वासनानंतर...

तातडीने कार्यवाही सुरू झाल्याने महिलांनी आपले १५ ऑगस्टचे उपोषण पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला.या बैठकीला बंजारा समाजाचे नायक बाबूसिंग राठोड, सरपंच सुमनबाई पेंदोर, उपसरपंच सरोज चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष कुंदन पवार, ग्रा.पं. सदस्य प्रबोध राठोड, प्रवीण श्रीमनवार, तसेच गावकरी व उपोषणकर्त्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय योजनांचा लाभ द्या:अ‍ॅड. निलेश हेलोंडे

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या घरी प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घ्याव्यात. पात्र कुटुंबीयांना सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी तत्परतेने कार्यवाही करावी, असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अ‍ॅड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अ‍ॅड. हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविणकुमार घुले, जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.मागील दीड वर्षात नांदेड जिल्ह्यात २४४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. ही बाब गंभीर असल्याचे नमूद करून अ‍ॅड. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांच्या घरी भेटी देऊन त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच संबंधित कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळतो आहे किंवा नाही, याची खातरजमा करून पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा, असे त्यांनी सांगितले. आत्महत्याग्रस्त प्रकरणांमध्ये मदत देण्यात आलेली प्रकरणे तसेच चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणांचा त्यांनी आढावा घेतला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४